# NATIONAL INTEGRATED MEDICAL ASSOCIATION

*MAHARASHTRA STATE BRANCH ( 2012 - 2014 )*

*(All India Organisation of Graduates of Integrated Medicine )*

*Regd. Under Societies Registration Act of 1860, Reg. No. BOM/282/71GBBSD) RPT. No. F/2469 Mum.*

| | |
|---|---|
| PRESIDENT | - DR. MANOHAR M. JUMALE , 43, Wanjari Nagar, NAGPUR - 440009. Mob. -9920037612 / 9373108405 |
| GEN.SECRETARY | - DR. SHAILESH S. NIKAM, 8, Sairaj Apt., Ashoka Marg, B/H Fame Cinema, Pune Road, NASHIK- 422011. Mob. - 9423972131 |
| TREASURER | - DR. RAJARAM H. JADHAV, Mohimata Clinic, A/P MADALMOHI,, Taluka Gewrai, Dist. Beed - 431127. Mob. - 9604452159 |


*जा.क्र. NIMA/MSB/GS/01 / 3803 /2012-14* **Date - 16 Jan 2014**

प्रति,
मा. संपादक
दै. ____________________

आपल्या लोकप्रिय दैनिकात कृपया सदर बातमीस प्रसिध्दी द्यावी ही नम्र विनंति.

## एम.सी.आय.एम.च्या निवडणुका त्वरित न राबविल्यास न्यायालात जाणार - एन.आय.एम.ए.(निमा)

आयुर्वेद , युनानी इत्यादि भारतीय वैद्यक पध्दतीच्या पदवीधारकांचे न्यायहक्क व कायदेशीर बाबी सांभाळणारी एन.आय.एम.ए. (निमा) ही राष्ट्रीय स्तरावरील शिखर संस्था आहे. गेल्या सुमारे ६६ वर्षापासुन ही संस्था आपल्या सदस्यांचे हित जोपासत आलेली आहे.

महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन (MCIM), मुंबई या परिषदेमार्फत आयुर्वेद, युनानी पदवीधारकांचे व्यवसाय परवाने देणे, नोंदणी-नुतनीकरण करणे, ज्ञान अद्ययावत करणेबाबींवर नियंत्रण ठेवणे आदि सर्व बाबी ,सांभाळल्या जातात. सर्व नोंदणीकृत पदवीधारकांमार्फत निवडणुकीद्वारे नियुक्त MCIM, Mumbai च्या कार्यकारिणीचा पाच वर्षांचा कार्यकाल हा जुन २०१२ मध्ये पुर्ण झालेला असुन त्यानंतर त्वरित निवडणुका संपन्न होऊन नविन कार्यकारिणी नियुक्त होणे अपेक्षित होते. परंतु आजपावेतो सुमारे दीड वर्षांचा काळ उलटला असुनही नियमानुसार आवश्यक सदर निवडणुका झालेल्या नाहीत व सदर दीड वर्षांच्या काळात प्रशासक नेमून प्रभारी कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

तरी नियमानुसार आवश्यक असलेल्या निवडणुका त्वरित न राबविल्यास एन.आय.एम.ए. (निमा) संघटना MCIM, Mumbai विरोधात न्यायालयात जाणार असल्याचे एन.आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य शाखेचे महासचिव डॉ. शैलेश एस. निकम यांनी स्पष्ट केलेले आहे.

एम.सी.आय.एम. च्या मागील कार्यकारिणीत एन.आय.एम.ए. चे अनेक सदस्य कार्यरत होते आणि त्यांच्या विशेष प्रयत्नांनी अनेक नवनविन बदल एम.सी.आय.एम. मध्ये घडुन आलेले आहेत. जुन्या असुरक्षित , मोडकळीस आलेल्या जागेतुन एम.सी.आय.एम. चे कार्यालय नविन, प्रशस्त, मोक्याच्या, सुरक्षित व सर्व नोंदणीकृत पदवीधारकांना सोईच्या जागी ("आरोग्य-भवन" येथे ) स्थलांतरीत करण्यात आले, कार्यालयीन संगणकीकरण, ऑनलाईन पद्धतीने नोंदणी नुतनीकरण, उच्चशिक्षण नोंदणीकरण आदी अनेक अद्ययावत बदल करण्यात आले, संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे ८०,००० पदवीधारकांसाठी ज्ञानवर्धक निरंतर वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन एम.सी.आय.एम. तर्फे करण्यात आले, ओळखीचा पुरावा असावा व नोंदणी दाखल्याचा गैरवापर टाळण्याच्या दृष्टीने एम.सी.आय.एम. तर्फे सर्व पदवीधारकांना ओळखपत्राचे वाटप करण्यात आले, MMP Act 1961 मधील कलम २५ मध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात आले अशी माहितीही डॉ. शैलेश निकम यांनी दिली.

परंतु सद्य परिस्थितीत नोंदणीकृत पदवीधारकांनी नियुक्त कार्यकारिणी नसल्याने

- आरोग्यभवन येथे मागील कार्यकारिणीने विशेष प्रयत्नांनी मिळविलेली जागा सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्या अंतर्गत वादामुळे गमवावी लागलेली आहे.

- प्रत्येक नोदणीकृत पदवीधारकाला नोंदणी नुतनीकरणासाठी ३१ डिसेंबर २०१५ पर्यन्त कमीतकमी तीन एम.सी.आय.एम. पुरस्कृत निरंतर वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमाला उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परंतु गत दीड वर्षांच्या काळात कार्यकारिणीच निवडलेली नसल्याने एकही निंरतर वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन एम.सी.आय.एम. तर्फे करण्यात आलेले नाही. तसेच त्वरित नविन कार्यकारिणी निवडणुकामार्फत अस्तित्वात न आल्यास नुतन कार्यकारिणीला कमी कालावधीत सदर निरंतर वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे जिकिरीचे होईल. यात पर्यायाने नुकसान हे सुमारे ८०,००० नोंदणीकृत पदवीधारकांचे होणार असुन सन २०१६ साली नोंदणी नुतनाकरणाच्यावेळी पदवीधारकांना मनस्ताप सोसावा लागण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

- ओळखपत्र वाटप अजुन संपुर्णतया झाले नसल्याने ज्यांना सदर ओळखपत्र अजुन प्राप्त झालेले नाही त्याच्यांवर अन्याय आहे.

- एम.सी.आय.एम. च्या कार्यकारिणीवर पदवीधारकांतीलच व्यक्ती असल्यास पदवीधारकांच्या अडीअडचणी, समस्या

सोडविण्यासाठी अग्रक्रमाने प्राधान्य मिळेल.

यासंदर्भात एम.सी.आय.एम. प्रभारी अध्यक्ष व प्रभारी प्रबंधक यांना वेळोवेळी एन.आय.एम.ए. (निमा) संघटनेने निवेदने दिलेली आहेत. परंतु अद्यापही सदर नुतन कार्यकारिणी निवडीसाठी आवश्यक निवडणुक प्रक्रिया सुरू करण्यात आलेली नाही. सदर प्रक्रिया त्वरीत सुरू न केल्यास एन.आय.एम.ए. (निमा) महाराष्ट्र राज्य शाखा न्यायालयाचे दरवाजे ठोठावेल असा इशारा महासचिव डॉ. शैलेश निकम यांनी दिलेला आहे.

यापुर्वीही सदर प्रकरणाविषयी मा. डॉ. विजयकुमार गावीतसाहेब, वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनाही निमा राज्य शाखा अध्यक्ष डॉ. मनोहर जुमळे, महासचिव डॉ. शैलेश निकम, सीसीआयएम सदस्य डॉ. आशुतोष कुलकर्णी, कार्यकारी समिती सदस्य सीसीआयएम डॉ. चंद्रकांत कोलते यांनी निवेदन दिलेले आहे.

डॉ. शैलेश निकम
सचिव
निमा महाराष्ट्र राज्य शाखा